# जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर

जिल्हा सेतु समिती

Email ID - mahaferfarnagar@gmail.com
Website: - https://ahilyanagar.maharashtra.gov.in

क्रमांकः सेतु समिती/का.वि.46/2026
अहिल्यानगर, दिनांक:17/08/2026

**विषयः आपले सरकार सेवा केंद्र प्रदान करण्यासाठी सन 2026 च्या सूधारीत जाहीरातीस अनुसरुन मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेबाबत . . .**

---

**संदर्भः** 1. या कार्यालयाकडील जाहीर सूचना क्र. सेतु समिती/का.वि.29/2026, दिनांकः 18/06/2026
2. शासन शुध्दीपत्रक क्रमांक आसेंके-2026/प्र.क्र.98/TECH-(E-1742666), दिनांक 09 जूलै 2026
3. या कार्यालयाकडील जाहीर सूचना क्र. सेतु समिती/का.वि.45/2026, दिनांकः 10/08/2026

उपरोक्त विषयास अनुसरुन सन 2026-आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज करणा-या सर्व अर्जदार यांना सूचित करण्यात येते की, संदर्भ क्र.1 चे जाहीर सूचनेनुसार अहिल्यानगर जिल्हयात आपले सरकार सेवा केंद्र प्रदान करण्यासाठी जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर प्रक्रियेनुसार दिनांक 22 जून 2026 ते दिनांक 06 जूलै 2026 या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आलेले होते व ज्या गावासाठी एकही अर्ज प्राप्त नाही, अशा गावांसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. तथापि, संदर्भ क्र.2 अन्वये शासनाने आपले सरकार सेवा केंद्र प्रदान करण्यासाठी अर्हतेमध्ये बदल केला आहे.

यास्तव, शासनाने संदर्भ क्र.2 चे शासन शुध्दीपत्रकानुसार नव्याने प्रक्रिया राबविण्याच्या सूचना दिलेल्या असल्याने, संदर्भ क्र.3 अन्वये **सुधारीत जाहीर सूचना** प्रसिध्द करण्यात आलेली आहे. **सदर सूचनेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.**

- ज्या अर्जदारांनी दिनांक 22 जून 2026 ते दिनांक 06 जूलै 2026 व अतिरिक्त मुदत दिलेल्या दिनांक 06 जूलै ते दिनांक 17 जूलै 2026 या कालावधीत **ऑनलाईन अर्ज दाखल केलेले आहेत, अशा अर्जदारांनी नव्याने अर्ज न भरता नवीन जाहीर सूचनेचे अवलोकन करुन आवश्यक कागदपत्रं पुर्वीच्या प्रोफाईलमध्ये अद्ययावत करावेत.**
- सदर कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी आपले लॉगीन आयडी व पासवर्डचा उपयोग करुन प्रोफाईल एडिट करावी व अर्जदार यांचेकडेस **उपलब्ध कागदपत्रं प्रोफाईल मध्ये अपलोड करावेत (केवळ .jpg.jpeg.png फाईल अपलोड करावी). <u>सर्व आवश्यक कागदपत्रं अपलोड केल्या खेरीज अर्ज सबमिट करु नये.</u>**
- याव्यतिरिक्त **ज्या अर्जदारांना नव्याने अर्ज दाखल करावयाचे आहे**, त्यांनी संदर्भ क्र.3 मधील अटी व शर्तीचे अवलोकन करुन प्रोफाईल तयार करुन अर्ज दाखल करावा.
- संदर्भ क्र.3 ची जाहीर सूचना अहिल्यानगर जिल्हयाच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://ahilyanagar.maharashtra.gov.in) उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

- अर्जासमवेत पोलीस विभागाकडील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र दाखल करण्यासाठी अर्जदार यांनी पोलीस विभागाकडेस अर्ज करतांना अर्जासमवेत संदर्भ क्र.3 ची जाहीर सूचना अथवा शासन शुध्दीपत्रक दिनांक 09 जूलै 2026 जोडून अर्ज सादर करावा.
- अर्जदार यांना दिनांक 13 ऑगस्ट 2026 ते दिनांक 12 सप्टेंबर 2026 रोजी सायंकाळी 06.00 वाजता **जूने अर्ज एडिट करण्याची व अर्ज नव्याने दाखल करण्याची मुभा असुन, दिनांक 12 सप्टेंबर 2026 रोजी सायंकाळी 06.00 पर्यंत** ऑनलाईन अर्जातील सर्व बाबी समाविष्ट करुन **अर्ज सबमिट करुन पीडीएफ आपलेस्तरावर जतन करुन ठेवावी.**
- उक्त कालावधीत अर्जातील कागदपत्रं अद्ययावत करुन अर्ज सबमिट करण्याची प्रक्रिया पूर्ण न केल्यास **अर्ज अपात्र ठरविण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील.**
- अर्जाची प्रत (हार्ड कॉपी) जिल्हाधिकारी कार्यालय अथवा प्रांत/तहसील कार्यालयास **जमा करण्याची आवश्यकता नाही.**

सदर मार्गदर्शक सूचना https://ahilyanagaraaplesarkar.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

दिनांकः ई-स्वाक्षरीत नमुद आहे.
ठिकाणः अहिल्यानगर

Digitally signed by
PANKAJ ASHIYA
Date: 18-08-2026
15:16:05

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा सेतु समिती, अहिल्यानगर**